C.C. (Legal) 1912

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.),
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, ता. जि. ठाणे - 401 101

जा.क्र. मिभा / मनपा / नर / ५४०४/२०१८-२० दिनांक - ०९/०२/२०२०

प्रति,
अधिकार पत्रधारक - मे. सिध्दीकी ग्रुप चे प्रो.प्रा. श्री. कमरुद्दीन सिद्दीकी
द्वारा - सल्लागार अभियंता - मे. बि.ए.सी.प्लॅनर्स ॲण्ड इंजिनिअर्स प्रा.लि.

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे - नवघर सर्वे क्र./ हिस्सा क्र.(जुना) 222 (नविन) 190 हि.क्र.1,(जुना) 223 (नविन) 191 हि.क्र.5 या जागेत नियोजित बांधकामास बांधकाम प्रारंभपत्र मिळणेबाबत.

संदर्भ :-
1) आपला दि.19/12/2019 चा अर्ज.
2) नागरी जमीन कमाल धारणा कायद्यातील कलम 10(3) 10(5) नुसार कार्यवाही झालेली नसलेबाबत विहित नमुन्यात क्र.300 च्या स्टॅम्प पेपरवर दि.12/09/2019 रोजीचे शपथपत्र.
3) तहसिलदार कार्यालय ठाणे यांचेकडील पत्र क्र. महसूल/क-1/टे-2/कावि-10654/एसआर-106/2019/589 दि.13/08/2019 अन्वये रुपांतरित कर भरण्यासाठी पत्र व दि.19/08/2019 अन्वये चलन भरल्याची पावती सादर.
4) दी इस्टेट इन्व्हेस्टमेंट कंपनी प्रा.लि. यांचेकडील स.क्र.222/1 साठी पत्र क्र. ईआय/एनओसी/ 424/DRC/2011 दि.18/02/2011 व आरई/445 दि.30/12/2003 व स.क्र.223/5 साठी पत्र क्र.इआय/एनओसी/803/2013 दि.11/01/2013 अन्वये नाहरकत दाखला.
5) अग्निशमन विभागाकडील पत्र क्र. मनपा/अग्नि/433/2019-20, दि.29/07/2019 अन्वये तात्पुरता नाहरकत दाखला.

## -: बांधकाम प्रारंभपत्र :- (नकाशे मंजुरीसह)

(फक्त जोत्यापर्यंत)

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 44, 45 अन्वये व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 253 ते 269 विकास कार्य करण्यासाठी / बांधकाम प्रारंभपत्र मिळण्यासाठी आपण विनंती केले नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे - नवघर सि.स.नं./सर्वे क्र./हिस्सा क्र. (जुना) 223 (नविन) 191 हि.क्र. 5, (जुना) 222 (नविन) 190 हि.क्र. 1 या जागेतील रेखांकन, इमारतीचे बांधकाम नकाशांस खालील अटी व शर्तीचे अनुपालन आपणाकडून होण्याच्या अधीन राहून ही मंजूरी देण्यात येत आहे.

1) सदर भुखंडाचा वापर फक्त बांधकाम नकाशात दर्शविलेल्या रहिवास + वाणिज्य वापरासाठीच करण्याचा आहे.
2) सदरच्या बांधकाम परवानगीने आपणास आपल्या हक्कात नसलेल्या जागेवर कोणतेही बांधकाम करता येणार नाही.

